# मूलभूत ग्रामीण तंत्रज्ञान - पदविका

# Diploma in Basic Rural Technology ( D.B.R.T.)

**परिचय**

ग्रामीण तंत्रज्ञान केंद्र हे एक ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र आहे. या केंद्राच्या माध्यमातून भारताच्या ग्रामीण भागात विज्ञान आणि तंत्रज्ञान पोचविण्यासाठी शिक्षण आणि शिक्षणातून चांगले जगणे या उद्देशाने हे केंद्र सुरू झाले आहे.

**भूमिका**

भारताच्या समाज रचनेतील बलुतेदार पद्धत आता काळाच्या ओघात नाहीशी झालेली आहे. पण समाजाच्या तांत्रिक गरजा मात्र कायम आहेत. त्या पुरी करणारी पर्यायी व्यवस्था मात्र आज नव्याने अस्तित्वात आलेली नाही. मग माणसाच्या, कुटुंबाच्या आणि गावाच्या तांत्रिक गरजा भागविणारी पर्यायी व्यवस्था ही आज खरी सामाजिक गरज आहे.

परदेशात अशा गरजा पुरविणा-या माणसांना हॅन्डीमॅन किंवा मल्टीस्किल वर्कर म्हणतात. आपल्या परिभाषेत सांगायचे झाले तर आधुनिक बलुतेदार.

ग्रामीण भागातील गरजांना पूरक पोषक सेवा देणारे वेगवेगळया प्रकारचे कौशल्य आत्मसात केलेले आणि त्यांची आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाची सांगड घालणारे आधुनिक ग्रामीण तंत्रज्ञ आता समाजाला हवे आहेत. हे आधुनिक ग्रामीण तंत्रज्ञ गावागावातून पुरविण्यासाठी संस्थेने मूलभूत ग्रामीण तंत्रज्ञानाचा पदविका अभ्यासक्रम सुरू केला आहे.

**पथदर्शक प्रकल्प**

पुण्यातील भारतीय शिक्षण संस्थेचे विज्ञान आश्रम हे ग्रामीण केंद्र जानेवारी १९८३ मध्ये शिक्षणतज्ञ, द्रष्टे विचारवंत डॉ. एस. एस. कलबाग यांनी सुरू केले. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाद्वारे समाजसेवा करण्याच्या उद्देशाने हे केंद्र सुरू करण्यात आले.

**वैशिष्ट्ये**

महात्मा गांधी आणि विनोबाजींना अभिप्रेत असलेली स्वयंपूर्ण गावांची संकल्पना साकार करावयाची असेल तर श्रमाधिष्ठित शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून ग्रामसेवा आणि स्वयंपूर्ण गावांचे निर्माण अशी रचना करणे आवश्यक वाटते.

महात्मा गांधी म्हणाले होते की, "हाताने काम केल्याने आपोआप बुद्धीला चालना मिळते" या तत्वावर ही प्रणाली आधारित आहे.

**शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये**

१. प्रात्यक्षिक अनुभवातून ज्ञान प्राप्त होते.
२. दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी शैक्षणिक दृष्टिने प्रशिक्षणार्थी तयार होतो.
३. समाजाला आवश्यक त्या सेवा गावपातळीवर उपलब्ध होतात.
४. समाजाला उपलब्ध करून दिलेल्या सेवांसाठी समाजाकडून मोबदला मिळतो.
५. शिकत असताना प्रशिक्षणार्थी कौशल्यांची प्रभुत्वपातळी गाठतो.

**अभ्यासक्रमाची गरज**

बहुतकरून विदयार्थ्यांना शाळेतील प्रचलित शिक्षणात रस नसतो हे माहित असूनही समाजमन हे स्वीकारत नाही परिणामतः बरेच विदयार्थी मधूनच शाळा सोडतात. याची प्रमुख कारणे

- त्यांना शिक्षणात गोडी नसते.
- अनुत्तीर्ण होतात.
- आर्थिक अडचणी असतात.
- कौटुंबिक परिस्थिती.

अशा विदयार्थ्यांच्या पुढे त्यांच्या भविष्याच्या बावतीत अनेक प्रश्न उभे राहतात. अशा विदयार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण दिल्यास त्यांच्या बुद्धीला चालना मिळते व उत्तीर्ण झालेल्या विदयार्थ्यापेक्षा ते अधिक कर्तबगार व होतकरू बनू शकतात अशा विदयार्थ्यासाठी आहे. उत्पादन कामातून शिक्षण या संकल्पनेवर ही शिक्षण पद्धती आधारलेली आहे.




- डी.बी.आर. टी.च्या कोर्समध्ये एका वर्षाचे प्रशिक्षण दिले जाते.
- वयोमर्यादा १५ते२० वर्षे ठेवण्यात आली आहे.
- अभ्यासक्रमासाठी एकून २४जागा उपलब्ध आहेत.
- शैक्षणिक पात्रता ८वी पास व त्यापुढे ठेवण्यात आली आहे.
- विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना प्रवेश दिला जाईल.
- प्रशिक्षणार्थीला कामाची आवड असणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांना वहुतंत्रज्ञान (*Maltiskill*) देऊन स्वतःच्या पायावर उभे राहून उदयोग करण्याची क्षमता आत्मविश्वास आणि प्रेरणा या अभ्यासक्रमातून दिली जाते.

**प्रशिक्षण पद्धती**

१. हाताने काम करण्यावर भर.
२. प्रात्याक्षिक शिक्षणावर आधारीत अभ्यासकम.
३. प्रशिक्षणाला दैनंदिन जीवनाची जोड.
४. परिसरातील नैसर्गिक भौगोलिक पारिस्थिती सर्व प्रकारची साधनसंपत्ती आणि समाजाच्या गरजा यांचा प्रशिक्षणात अंतर्भाव असेल.
५. संगणकाचे साहाय्याने आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा प्रशिक्षणात समावेश.
६. प्रात्याक्षिक शिक्षणातून समाजाला सेवा पुरविणे आणि त्यातून समाजाकडून मोवदलाही मिळेल.

- कोर्सचे नाव - डी.बी.आर.टी.
- शैक्षणिक पात्रता - आठवी पास व त्यापुढे
- एकूण जागा - २४ ( विद्यार्थी विद्यार्थीनी मिळून )
- कालावधी - १ पूर्ण वर्ष
- वेळ - पूर्ण दिवस निवासी

**कार्यक्रम**

शिकत असताना प्रशिक्षणार्थी उपयोगी वस्तू बनवितो. त्यासाठी लागणारे साहित्य मिळविणे. खर्चाचे अंदाजपत्रक किंमत ठरविणे. मजुरीचा खर्च काढणे इ. बाबींचा विचार करून ती वस्तू बनवून तीची विक्रीची किंमत ठरवू शकतो. लहान प्रमाणात व्यवसाय करताना कोणत्या अडचणी येतात व त्या कशा सोडवाव्यात हे लक्षात आल्यास मोठया प्रमाणावर व्यवसाय करण्यासाठी आत्मविश्वास निर्माण होतो. उदाहरणार्थ -

आम्ही विद्यार्थ्यांना कार्यशाळेत कौशल्य शिकवतो. या कौशल्याच्या आधारे ते आपल्या नेहमीच्या वापरातील वस्तू करू शकतात. उदा. टेबल. रॅक. कॉट. खुर्ची वगैरे या वस्तू बनवितांना येणा-या अडचणी कोणत्या . वस्तू काशा बनवायच्या, आराखडे व मोजमाप कसे घ्यावयाचे कोणती हत्यारे वापरायची,वस्तूची किंमत कशी काढायची या सर्व गोष्टी विद्यार्थी शिकतात. प्रशिक्षणात विदयार्थ्यांना कंत्राट पद्धतीने काम दिले जाते. त्यामुळे ज्ञानाबरोबर कमाई देखील होते व कौशल्यही वाढते.

कौशल्य मिळविण्यासाठी प्रत्यक्ष अनुभवाची गरज असते. त्यासाठी कुक्कुट पालनाचे उदाहरण देता येईल. कुक्कुट पालनाचा व्यवसाय करताना त्यामध्ये एक दिवसाच्या पिल्लाची पूर्ण वाढ होईपर्यंत त्याला वाढविण्याचा प्रकल्प प्रशिक्षणार्थीला दिला जातो. अशा त-हेने स्वतःचा व्यवसाय आपण करीत असल्यासारखा अनुभव विदयार्थी घेऊ शकतो.

शिक्षण हे दैनंदिन जीवनाशी जडले गेले पाहिजे. उदा. ग्रामीण प्रयोगशाळेत शिकलेल्या मुलींच्या गटाला आपल्या परिसरातील वाडी वस्तीवरील मुला-मुलींचे रक्तगट तपासता येतील. गावासाठी स्वच्छता गृहे बांधून देता येतील. अशा त-हेने कामाचा किमान दर्जा राखणारे व समाजाशी नाते जोडणारे समाजोपयोगी शिक्षण विदयार्थ्याला उत्पादनाची कौशल्ये देणारे ठरू शकेल.

प्रत्येक गोष्ट करण्यापूर्वी तत्संबंधीची आकडेवारी गोळा करून तिचा उपयोग पुढील वेळेला निर्णय घेण्याचे धडे अभ्यासक्रमातून प्रशिक्षणार्थीला मिळतात.

कोर्सची एकूण वार्षिक फी रू. ३0,000/- असेल. या फीमध्ये रू. ६000/- ही कोर्सची फी आणि २४,000/- ही वर्षाची निवास,भोजन फी आहे. यावरील खर्च विद्यार्थ्याने केलेल्या कमाईतून करणे अपेक्षित आहे.

**अभ्यासक्रम**

डी.बी.आर.टी. ( *Diploma in Basic Rural Technology* )

हा कोर्स 'नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ ओपन स्कूलिंग` नवी दिल्ली यांचा मान्यता प्राप्त डिप्लोमा कोर्स प्रत्येक वर्षी १0 जुलै ते २५ जुन (३00 दिवस)या कालावधीत दररोज ८ तास याप्रमाणे शिकवला जातो. या कोर्समध्ये -

अ) अभियांत्रिकी ब) ऊर्जा आणि पर्यावरण क) शेती व पशुपालन ड) गृह आणि आरोग्य

या विभागांचे प्रशिक्षण तीन-तीन महिन्यांच्या कालावधीत दिले जाते. प्रत्येक विदयार्थ्यांचे प्रत्येक विषयाचा एक याप्रमाणे एकंदर चार प्रकल्प करावयाचे असतात. पूर्वी केलेल्या प्रकल्पांची उदाहरणे दिली आहेत. प्रकल्प निवडताना तो समाजाला उपयोगी ठरू शकेल असा निवडावा.

अ) अभियांत्रिकी ः

- **थिअरी -**

  मापन, कार्य,उर्जा,मजबुतीचे प्रकार या विषयीच्या संकल्पना, साधी मशीन, वंगण,मटेरीअल (लोखंड, लाकूड, सिमेंट, माती )सदिश आणि अदिश राशी, कार्यक्षमता .

- **प्रात्यक्षिक -**

  मापन, कटींग, फायलींग, वेल्डींग, सोल्डरींग, थ्रेडींग इत्यादी क्रिया करून फॅब्रिकेशनच्या वेगवेगळया वस्तू बनविणे . उदा . मांडणी,कॉट, खुर्ची इ . साधे सुतारकाम, प्लायवूड वरती सनमायका बसविणे व त्यापासून विविध वस्तूंची निर्मिती करणे उदा . स्टूलचे किंवा टेबलचे टॉप, फेरोसिमेंटच्या वस्तू बनविणे उदा . फेरोसिमेंट शीट, आर . सी . सी . कॉलम, रंगकाम, पॉलिश करणे, टरपेंट ऑईल, टचवूड इ . अभ्यास व वापर .



- **प्रकल्प -**

  फोल्डींग चेअर बनविणे, खोल्यांचे बांधकाम करणे, घरांचे छप्पर बसविणे, कोंबडयांचे पिंजरे तयार करणे, शेतीची अवजारे तयार करणे, पाण्याची टाकी बनविणे, स्वच्छता गृहे बांधणे, पोल्ट्रीसाठी बुडर तयार करणे, कार्य शाळेतील वस्तू तयार करणे - उदा . टेबल, स्टूल .

ब) ऊर्जा आणि पर्यावरण ः

- **थिअरी -**

  वीज, इलेक्ट्रॉन, कंडक्टर, सेमीकंडक्टर, नॉन कंडक्टर, ओहमचा नियम, पॉवरसर्किटस्, सिंगल फेज व थ्री फेज वीज पुरवठा, सौर उर्जा, पाण्याचे पंप व त्यांचे प्रकार, सेप्टीक टॅंक व बायोगॅस संयंत्र, लेवलिंग, कॉंटूर, भूजल, नकाशे यांचा अभ्यास .

- **प्रात्यक्षिक -**

  वायरचे प्रकार व जॉईटचे प्रकार, साधी इलेक्ट्रीक सर्किटस्, वायरींगचे प्रकार (केसींग,केपींग,कंटूर), थ्री फेज व डी . ओ . एल . स्टार्टर, सिंगल फेज मोटार, डिझेल इंजीनची देखभाल, बायोगॅस सयंत्राचा अभ्यास, वातीचा स्टोव्ह, सेप्टीक टॅंक, प्लेन टेबल सर्व्हेक्षणातून नकाशा तयार करणे, कंटूर सर्व्हेक्षण करून एक धरण बांधणी करणे, हातपंपाची दुरूस्ती, एल . ई . डी . पासून उत्पादने बनविणे . उदा . बल्ब(AC/DC), टॉर्च, बॅटरीज्,

- **प्रकल्प -**

  घरांची लाईट फिटींग, डि . सी . टयुब सर्किट, डिझेल इंजीन दुरूस्ती, मोटार, टेस्टींग किट बनविणे, कांडी कोळसा बनविणे, बॅटरी चार्जर बनविणे,पाणलोट क्षेत्राचा अभ्यास करून एक बंधारा बांधणे, निर्धूर चूल बनविणे, घरगुती उपकरणे दुरूस्ती (उदा . मिक्सर,फॅन,इस्त्री,कुलर,हिटर), विहिरीसाठी जागा निवडणे, एल . ई . डी . पासून उत्पादने बनविणे .



## क) शेती व पशुपालन ः

- **थिअरी -**



वनस्पती, प्राणी, पक्षी, आहार, वेगवेगळी खते, किटक, मातीचे प्रकार, कृतीम रेतन, जमाखर्च, अंदाजपत्रक, जनावरांसाठी रोग प्रतिबंधक, कोंबडयांचे रोग व उपचार,बॅलनशिट, नफा-तोटा यांची माहिती घेणे, सिंचन पद्धती .

- **प्रात्यक्षिक -**

एक पीक घेऊन नफा-तोटा पत्रक तयार करणे, नर्सरीमध्ये रोपे तयार करणे, विविध प्रकारची कलमे तयार करणे, फवारणी यंत्राचा अभ्यास, सिंचनपद्धती (तुषार व ठिबक), डेअरी व्यवसायाची माहिती घेणे, ए.आय.सेंटरला भेट देणे, जनावरांचे वय व वजनाचा अंदाज, टि.डी.एन.नुसार खाद्यांची आवश्यकता ठरविणे, बंदिस्त शेळीपालन, पोल्ट्रीत ब्रॉयलर पक्षी वाढवून विक्री करणे, नारळ, सुपारी, आंबा, काजू, चिकू यांच्या लागवडीपासून फळविक्रीपर्यंतची सर्व माहिती प्रात्यक्षिकाद्वारे घेणे .

- **प्रकल्प -**

नर्सरीमध्ये रोपे तयार करणे, एका पीकाचा आढावा घेणे, ड्राय चिकन तयार करणे, बायोगॅसची वेगवेगळया घटकांपासून निर्मीती, पोल्ट्रीमध्ये एक बॅच वाढविणे, डेअरीमध्ये एक महिना व्यवहार सांभाळणे, ए.आय.सेंटरमध्ये एक महिना जनावरांचा अभ्यास करणे, कारखान्यातील उप उत्पादक घटकांचा जनावरांसाठी खाद्य म्हणून उपयोग याचा उपयोग करणे, किचन वेस्टपासून जनावरांचे खाद्य बनविणे, केरसुणी बांधणे, नारळाचे झाप विणणे, काथ्या व काथ्याच्या वस्तू करणे, नारळापासून शोभिवंत वस्तू किंवा भेटवस्तू तयार करणे, झोपडी तयार करणे, बांबू आणि बांबूपासून विविध वस्तू तयार करणे . (बुरूड काम)

## ड) गृह आणि आरोग्य ः

- **थिअरी -**

स्वच्छता, आरोग्य, रोग पसरण्याची कारणे, रोगप्रतिबंधक, बालकाची वाढ व त्यांच्या गरजा, संतुलित आहार, डास व माशा, जीन्स व वंशपरंपरा, आरोग्य साधना .



- **प्रात्यक्षिक -**

शिवणकाम व विणकाम या विषयाची प्राथमिक माहिती, मुलांचे आरोग्य विषयक संरक्षण करणे, पाणी शुद्ध करणे, रक्ताची रक्तगट व हिमोग्लोबीन परीक्षण करणे, माती परीक्षा, खाद्यपदार्थ बनविणे, सोलर प्रेशर कुकरचा वापर, बेकरीतील पदार्थाची निर्मिती, दुधाचे पदार्थ तसेच शेतीमालाची परीक्षा, फळप्रक्रिया प्रात्यक्षिक (लोणचे, जॅम, जेली, सॉस, सरबते तयार करणे), वेगवेगळे मसाले तयार करणे, वेगवेगळया चटण्या बनविणे, भरतकाम करणे .

- **प्रकल्प -**

पाणी शुद्ध करण्याच्या वेगवेगळया पद्धती, लहान मुलांची हिमोग्लोबीन तपासणी करणे, त्याचप्रमाणे गरोदर स्त्रियांच्या रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण शोधणे, माती परीक्षा, शाळेतील विदयार्थ्यांचे रक्तगट तपासणे, बेकरी पदार्थ तयार करणे, वेगवेगळी लोणची बनविणे, कमी स्निग्धार्थ असलेले शेंगदाणे बनविणे, स्वेटर किंवा मफलर विणने, खाद्यपदार्थ तयार करून विक्री करणे, जांभूळ, कोकम, काजू, करवंद यांची सरबते, मॅंगो पल्प, फणस पल्प कॅन करणे, काजू, करवंद बर्फी बनविणे, फणसाचे वेफर्स, फणसपोळी, आंबा पोळी.

**ई) अभियांत्रिकी चित्रकला व वस्तूंच्या किमती काढणे :**



आयसोमेट्रीक प्रोजेक्शन, प्लॅन, इलीवेशन व साइड व्हू, फ्लो चार्टस्, आलेखाचे विविध प्रकार, कॉंटूर, वायरींगची सर्कीटस् काढणे, वेगवेगळया वस्तूंच्या/पदार्थांच्या किंमती काढणे, संगणकावरती प्रोजेक्ट रिपोर्ट लिहीणे, प्रेझेन्टेशन तयार करणे, किंमत काढणे इ.

**मूल्यमापन पद्धती परीक्षा :**

ही परीक्षा 'नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ ओपन स्कूलिंग', नवी दिल्ली यांच्यामार्फत दर वर्षी ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात घेण्यात येते. ती पुढीलप्रमाणे -

| *Subject code* | *Name of the Subject* | *Time in Hrs.* | | *Weight age %* | | *Internal Assessment* |
|---|---|---|---|---|---|---|
| | | *Theory* | *Practical* | *Theory* | *Practical* | |
| *442* | *Home & Health* | *1* | *2* | *30* | *50* | *20* |
| *443* | *Agriculture* | *1* | *2* | *30* | *50* | *20* |
| *444* | *Elect. Engg.* | *2* | *4* | *60* | *100* | *40* |

**परीक्षा निकाल :**

'नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ ओपन स्कूलिंग' यांच्यामार्फत परीक्षेनंतर साधारण दोन ते अडीच महिन्यानंतर घोषीत करण्यात येतो व त्यांच्याकडूनच प्रमाणपत्र दिले जाते.

**अल्पमुदतीचे अभ्यासक्रम :**

संस्थेत शिकविल्या जाणा-या अल्पमुदतीच्या कोर्सची माहिती खाली दिलेली आहे. यातील आपणांस योग्य आणि हवा असलेला कोर्स नियमानुसार पूर्ण केल्यास संस्थेचे प्रमाणपत्र दिले जाते.

| अ.क्र. | कोर्सचे नाव | एकूण जागा | कोर्सची फी | कालावधी | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | वर्कशॉप फॅब्रीकेशन | ५ | १०५०/- | ३ महिने | पूर्ण दिवस |
| २ | इलेक्ट्रीक एप्लायन्सेस | ५ | १०५०/- | ३ महिने | पूर्ण दिवस |
| ३ | शेती | ५ | १०५०/- | ३ महिने | पूर्ण दिवस |
| ४ | खादयपदार्थ निर्मिती | ५ | १०५०/- | ३ महिने | पूर्ण दिवस |
| ५ | शिवणकाम / कर्तन | १५ | १०००/- | १ वर्ष | अर्धा दिवस |
| ६ | एल.ई.डी. उत्पादन निर्मिती | ५ | ५००/- | ७ दिवस | पूर्ण दिवस |
| ७ | संगणक | | | | |
| | *Ms Office* | १० | ५५०/- | २ महिने | रोज १ तास |
| | *MS CIT (MKCL)* | ३० | २५००/- | ३ महिने | रोज १ तास |
| | *Basic Internet* | १० | २५०/- | ५ दिवस | रोज १ तास |
| | *C.T.P.* (कॉम्प्युटर हार्डवेअर) | ५ | १५००/- | २ महिने | रोज १ तास |
| ८ | बालसंगोपन व शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम | ५० | १८५०/- | १ वर्ष | सुट्टीचा कालावधी |
| ९ | स्वयं-साहाय्य गट (एसएचजी) प्रेरक/प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम | ६० | १६००/- | १ वर्ष | सुट्टीचा कालावधी |

**विशेष प्रशिक्षण वर्ग ः**

१) सोलर उपकरणे दुरूस्ती व देखभाल
२) दुग्धजन्य पदार्थ निर्मिती
३) कोरफड तेल निर्मिती
४) राखी उत्पादन निर्मिती
५) अत्तर निर्मिती
६) विविध पापड निर्मिती
७) बेकरी उत्पादन
८) ड्रायक्लिनींग
९) मेणबत्ती उत्पादन
१०) खडू उत्पादन
११) फळांपासून विविध उत्पादने बनविणे
१२) *Soap making(Phenyle,Liquid soap,Nill,Detergent)*

**संस्थेतील सुविधा ः**

- **विभाग ःअभियांत्रिकी**

संस्थेचे स्वतःचे मालकीचे १२६० चौ.फूट अद्ययावत यंत्रसामुग्रींनी युक्त वर्कशॉप आहे.यामध्ये लेथ मशीन्स, वेल्डींग(आर्क,गॅस व स्पॉट),सरफेस ग्राईडर, हॅक्सा मशिन, ॲगल ग्राईडर, पॉवर ड्रील, हॅन्ड ड्रील, कॉम्प्रेसर, हायड्रॉलिक पाईप बेन्डींग मशिन इत्यादींचा समावेश आहे.

- **विभाग ः ऊर्जा आणि पर्यावरण**

यामध्ये इलेक्ट्रीक मोटर्स, स्वीच बोर्ड, ट्रान्सफार्मर, इलेक्ट्रॉनिक साहित्य, डंपी लेवल, प्लेन टेबल, बायोगॅस, डिझेल इंजिन वगैरेचा समावेश आहे.

- **विभाग ः शेती व पशुपालन**

शेतीची सर्व प्रकारची अवजारे, कलम बांधणीचे साहित्य, शिवाय संस्थेच्या परिसरात ग्रीन हाऊस, पॉली हाऊस, पोल्ट्री, संकरीत गाई, बोकड, शेळया, इत्यादी अभ्यासक्रमासाठी उपलब्ध आहेत.

- **विभाग ः गृह आणि आरोग्य**

शिलाई व विणकाम मशिन, खाद्यपदार्थ टिकविण्याचे साहित्य, सोलर व प्रेशर कुकर, रक्त तपासण्यासाठी प्रयोगशाळा, माती परीक्षण व पाणी परीक्षा कीट, ड्रायर, ओव्हन, दूध व शेतीमालाची परीक्षा साधने तसेच बेकरीसाठी लागणारे साहित्य यांचा अंतर्भाव.

**संस्थेतील इतर सुविधा ः**

| | | | |
|---|---|---|---|
| १) संगणक लॅब | २) कलर टिव्ही | ३) व्ही.सी.आर. | ४) लॅपटॉप |
| ५) डि.व्ही.डी.प्लेअर | ६) होमथिएटर सिस्टिम्स् | ७) स्लाईड प्रोजेक्टर | ८) ओव्हरहेड प्रोजेक्टर |
| ९) डिजीटल कॅमेरा | १०) इंटरनेट सुविधा | | |

**विशेष ः**

संदर्भ ग्रंथालय, अभ्यासक्रमाच्या कॅसेट्स, लायब्ररी, क्लासरूम इत्यादी सर्व भौतिक सुविधा संस्थेकडे उपलब्ध आहेत.

**वसतिगृह ः**

विदयार्थ्यी आणि विदयार्थीनींसाठी स्वतंत्र वसतिगृह उपलब्ध आहे.प्रत्येकी २५ -२५ विदयार्थ्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था आहे.

**अभ्यास साहित्याची उपलब्धता ः**

१) ग्रामीण तंत्रज्ञान (३ भागात) २) प्रात्यक्षिक हस्तपुस्तिका ३) ड्रॉईंग व कॉस्टिंग हस्तपुस्तिका
४) प्रयोगशाळा संदर्भ हस्तपुस्तिका ५) शेळी पालन, पोल्ट्री, ॲनिमल हजबंड्री ६) सोपे शिवणकाम हस्तपुस्तिका
७) डिझाईन मॅन्युअल (वेगवेगळया विषयांवर) ८) मल्टीमिडीया सीडीज् ९) एल.ई.डी. मॅन्युअल
१०) पॉलीहाऊस मॅन्युअल ११) जीवनोपयोगी शिक्षण पुस्तिका १२)आय.बी.टी.अंमलबजावणी पुस्तिका
१३) पाठांची ध्वनी चित्रफित - प्लेन टेबल सर्व्हेक्षण, फेरोसिमेंट, तापमान मोजने, फवारणी, मोजमाप, वीज, डिझेल इंजिन, सुतार काम, पेट्रोल इंजिन ,सुतारकाम
१४)कृषि संदर्भ ग्रंथालय - शेतकी, कार्यशाळा, अन्नप्रक्रिया , भुजल , बांधकाम , विद्युत अभियांत्रिकी, ऊर्जा व पर्यावरण , पशुपालन , कुक्कुटपालन, गृह आरोग्य या विभागांशी संबधित असणारी पुस्तके व संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत.

**वसतिगृहे**

निसर्गरम्य वातावरणात समृद्ध पर्यावरणात विदयार्थी आणि विदयार्थीनींसाठी सर्व सुविधांनी युक्त अशी वसतिगृहे संस्थेने सुरू केली आहेत.संपूर्ण एक वर्षाच्या कालावधीच्या डी.बी.आर.टी. अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विदयार्थी विदयार्थीनींना राहण्याची व जेवणाची सुविधा संस्थेने उपलब्ध करून दिलेली आहे.कमी मुदतीच्या( *Short course* ) अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना वसतिगृहात जागा रिकामी असेल तर प्रवेश दिला जातो. वसतिगृहाच्या मर्यादित प्रवेश क्षमतेमुळे (२४) ज्यांना वसतिगृहात प्रवेश मिळणे शक्य होत नाही त्यांना स्वतःची इतरत्र सोय करावी लागेल. वसतिगृहात्मक प्रशिक्षणाचे काही लाभ पुढीलप्रमाणे -

१) परगावाहून शिक्षण घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना राहण्याची व जेवणाची सुविधा, प्रशिक्षणाचेच ठिकाणी उपलब्ध होते.
२) विद्यार्थ्यांना दैनंदिन दिनक्रमाची शिस्त लागते.
३) दैनंदिन व्यायाम, ध्यानधारणा, योगासने इ.उपक्रमांतून विद्यार्थ्यांचे शरीर, मन सुदृढ राहते.
४) विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग्य वातावरण, वसतिगृहात्मक व्यवस्थेत उपलब्ध होते.
५) विद्यार्थ्यांचे परस्पर संबंध चांगले राहतात. सहकार्याची भूमिका वाढते.
६) वसतिगृहामध्ये राहणा-या विद्यार्थ्यांमध्ये दिनचर्येशी संबंधित कामे स्वतः सुयोग्यपणे करण्याची जाणीव निर्माण होते.
७) वसतिगृह व्यवस्थापन विद्यार्थीच करत असतात. त्यातून त्यांना वसतिगृह व्यवस्थापनेचे प्रशिक्षण मिळते.

**करमणूक व मनोरंजन ः**

संस्थेमध्ये सामुहिक मनोरंजनाच्या व करमणूकीच्या सुविधा उपलब्ध आहेत. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, कोजागरी पोर्णिमा, होळी या विविध दिनानिमित्त त्यादिवशी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी होण्याची संधी दिली जाते. अशा कार्यक्रमांमध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना कार्यक्रम नियोजन व व्यवस्थापनाचे अनुभव मिळतात. विद्यार्थ्यांना दुर्गभ्रमण, गिर्यारोहण,सायकल सफर अन्य शैक्षणिक सहली यामध्येही सहभागी होता येते.

**विद्यार्थ्यांसाठी नियम ः**

१) वसतिगृहात राहणा-या विदयार्थ्यांनी आपल्याजवळ मौल्यवान वस्तु,पैसे ठेऊ नयेत,ठेवल्यास त्याची जबाबदारी स्वतःच स्विकारावी.

२) विदयार्थ्यांनी स्वतःचे कपडे व आपले इतर सामान ठेवण्यासाठी सुरक्षित अशी बॅग येताना आणावी.

३) त्याच्याजवळ स्वतःची पाण्याची बादली, मग, साबण ,सुटकेस, टॉर्च आणि प्रसाधन साहित्य असावे.

४) वसतिगृहात राहत असताना वेळोवेळी नव्याने निर्धारित केलेल्या नियमांचे व शिस्तिचे पालन करणे विदयार्थ्यावर बंधनकारक राहिल.

५) विदयार्थ्याच्या पालकांनी आपल्या पाल्याच्या खर्चासाठी बॅकेत त्याच्या नावाचे खाते उघडुन *ATM* कार्ड दयावे.

६) वसतिगृहात राहत असताना विदयार्थ्याला काही गंभीर अशा आपत्तीस सामोरे जावे लागेल (उदा. गंभीर आजारपण, अपघात) तर अशावेळी त्यांच्या पालकांशी संपर्क साधण्यासाठी त्यांनी आपला दुरध्वनी, मोबाईल नंबर दिला पाहिजे. वेळप्रसंगी अशा विदयार्थ्याला घरी पोहोचविण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास त्यासाठी होणारा खर्च पालकांना दयावा लागेल. आपल्या पाल्याला एखादा विकार किंवा प्रकृतीविषयक विशेष समस्या असल्यास त्याच्या पालकांनी त्याची पूर्व सुचना संस्था प्रमुखांना देणे आवश्यक आहे. अपघात, विशेष आजार अशी समस्या निर्माण झाल्यास वैदयकिय मदत, रूग्णालयाचा खर्च इत्यादी गोष्टी तातडीने केल्या जातील परंतु त्याचा खर्च पालकांना करावा लागेल. तसेच संस्थेच्या स्थावर मालमत्तेचे नुकसान केल्यास त्याची संपूर्ण भरपाई करून द्यावी लागेल.

**कामकाजाची वेळ ः-**

सर्व साधारणपणे कामकाजाची वेळ सकाळी ९:३० ते सायंकाळी ५.00 अशी राहील .तथापी त्यामध्ये लवचिकता असेल व विविध विभागांच्या गरजांप्रमाणे वेळेत बदल होऊ शकतो.

**भोजनालयासंबंधीचे नियम ः**

१) विदयार्थ्यांना भोजनालयाच्या नियमांचे पालन करावे लागेल.

२) सकाळचा नास्ता, दुपारचे, संध्याकाळचे जेवण, भोजनालयात उपलब्ध करून दिले जाईल.

३) जेवण घ्यावयाचे नसल्यास तसे भोजनालय प्रमुखास लेखी कळवावे लागेल. अन्यथा त्या दिवशीचा भोजनाचा आकार घेतला जाईल.

४) शक्यतो भोजनालयाचे व्यवस्थापन विदयार्थ्याकडेच राहिल. त्यामुळेच त्यांना आपल्या कामाची जबाबदारी पार पाडण्याचा अनुभव मिळेल.

**अभ्यासक्रमाविषयीचे नियम ः**

प्रत्येक विदयार्थ्याची वार्षिक हजेरी २५0 दिवसांपेक्षा कमी असल्यास प्रमाणपत्र मिळणार नाही .परवानगीशिवाय विदयार्थ्याला गैरहजर राहता येणार नाही.

**वर्तणूक ः**

प्रत्येकाने आपली वर्तणूक चांगली ठेवावी. वर्तणूकीत काही गैर आढळल्यास त्या विदयार्थ्याचे नाव संस्थेतुन कमी करण्याचा अधिकार संस्था प्रमुखास राहिल किंवा विदयार्थी स्वतःहुन संस्था सोडुन गेल्यास संस्थेमध्ये भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

**कमाई ः-**

कमवा व शिका या अंतर्गत शिकता शिकता प्रत्येकाने कामे करून त्यातुन कमाई करावी अशी अपेक्षा आहे. प्रत्येक विदयार्थ्याने एक वर्षाच्या कालावधीमध्ये कमीत कमी एक हजार रूपये कमाई करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. कामची संधी देण्याची जबाबदारी संस्थेची राहील. या कमाईबरोबरच विदयार्थ्यांना शिकलेल्या ज्ञानाचा वापर करण्याची संधी मिळेल. ते अनुभवांनी समृध्द होतील.

**सुट्टया व रजा ः-**

आठवडयातुन एक दिवस सुट्टी राहील. याव्यतिरिक्त एका वर्षामध्ये दहा सार्वजनिक सुट्टया राहतील. याखेरीज विदयार्थ्याला वैयक्तिक कारणासाठी रजा पाहिजे असल्यास त्याला लेखी पूर्वसूचना दयावी लागेल. अशा सुट्टयांमध्ये बुडणारा विद्याभ्यास भरून काढण्यासाठी त्या विदयार्थ्याला वैयक्तिक शिकवणी द्यावयाची झाल्याास अशा विदयार्थ्याला प्रत्येकी १00 रू. फी दयावी लागेल.

**वार्षिक सार्वजनिक सुट्टया (१0 दिवस)**

१) प्रजासत्ताक दिन - २६ जानेवारी ः १ दिवस
२) गुढीपाडवा - १ दिवस
३) स्वातंत्र्य दिन - १५ ऑगस्ट ः १ दिवस
४) गणपती ः २ दिवस
५) दसरा ः १ दिवस
६) दीपावली ः ४ दिवस